आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक ३०८ वा ● रविवार दि. २८ एप्रिल २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## निवडणूक सामान्य निरीक्षकांनी केली अहमदपूर तालुक्यातील मतदान केंद्र, स्थिर निगराणी पथकाची पाहणी

लातूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणाऱ्या किमान आवश्यक सुविधांचा आढावा (एएमएफ) घेण्यासाठी निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी आज अहमदपूर तालुक्यातील विविध मतदान केंद्रांची पाहणी केली.

अहमदपूर येथे उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी मतदान केंद्रांची पाहणी करून तेथे उपलब्ध किमान आवश्यक सुविधांचा आढावा घेतला. तसेच अनुषंगिक सूचना दिल्या. किनगाव येथील स्थिर निगराणी पथकाला भेट देवून या पथकाच्या कामकाजाचाही आढावा घेतला.

## छ. संभाजीनगरात महायुतीला मोठा धक्का; अजितदादांच्या शिलेदाराचा उमेदवारी अर्ज

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरच्या राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघामध्ये नवे ट्विस्ट आले आहे. राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज घोडके यांनी लोकसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मनोज घोडके यांची उमेदवारी कायम राहिल्यास या मतदारसंघामध्ये ओबीसींच्या मतांमध्ये मोठी फूट पडण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये राष्ट्रवादीत मोठी फूट पडल्याचं समोर आलं आहे. राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज घोडके यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्ज मागे घेणार नसून पूर्ण ताकतीने निवडणूक लढू आणि ओबीसी समाजाचा एक खासदार संसदेत पाठवू अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. छगन भुजबळ यांनी आयुष्यभर दुसऱ्यांना तिकीटं देण्याचं काम केलं मात्र त्यांना तिकीट मिळत नाही. महायुतीला ओबीसीच्या मतांची गरज नसल्यामुळे आमचा प्रतिनिधी असावा म्हणून अर्ज दाखल केल्याचं घोडके यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

घोडके हे राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष आहेत, सोबतच ते समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष देखील आहेत. भुजबळ यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख आहे. घोडके यांचा उमेदवारी अर्ज कायम राहिल्यास छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात ओबीसी मतांमध्ये मोठी फूट पडू शकते, त्याचा फटका हा महायुतीच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये महाविकास आघाडीच्या वतीनं शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महायुतीकडून शिवसेनेचे नेते संदीपान भुमरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र आता राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज घोडके यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या मतदारसंघात मोठे ट्विस्ट निर्माण झाले आहे. याचा मोठा फटका हा महायुतीचा बसण्याची शक्यता आहे.

## माजी मंत्री नसीम खान यांनी मोठा आरोप करत प्रचाराला दिला नकार

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसला एक मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीमध्ये काही जागांवरून नाराजीनाट्य रंगल्यानंतर काँग्रेसमध्ये अंतर्गत धुसफूस मोठ्या प्रमाणावर आहे. त्यातच उत्तर मध्य मुंबईसाठी वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर काँग्रेसचे नेते, माजी मंत्री नसीम खान यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहून आपण स्टार प्रचारक पदाचा आणि प्रचार समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे नसीम खान यांनी सांगितले. काँग्रेसने राज्यात एकही मुस्लीम उमेदवार दिला नाही, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

''काँग्रेसला मुस्लीमांची मते तर हवी असतात, पण त्यांना उमेदवारी का नाही?'', असा प्रश्न उपस्थित करून नसीम खान यांनी आपली नाराजी उघड केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार उत्तर मध्य मुंबईतून तिकीट मिळविण्यासाठी नसीम खान प्रयत्नशील होते, मात्र याठिकाणी वर्षा गायकवाड यांना उमेदवारी मिळाल्यामुळे ते नाराज झाले. नसीम खान यांनी खरगेंना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, ते लोकसभा मतदानाचे जे टप्पे उरले आहेत, त्याच्या प्रचारात सहभागी होणार नाहीत. यासाठी नसीम खान यांनी दोन कारणे दिली आहेत. पहिले म्हणजे, महाविकास आघाडीने महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघापैकी एकाही मतदारसंघात मुस्लीम उमेदवार दिलेला नाही. दुसरे कारण म्हणजे, राज्यातील अनेक मुस्लीम संघटना, नेते आणि पक्षातील कार्यकर्ते यांना अपेक्षा होती की, काँग्रेस पक्ष तरी निदान एखाद्या मुस्लीम नेत्याला उमेदवारी देईल. पण दुर्दैवाने काँग्रेसनेही उमेदवारी दिलेली नाही. नसीम खान हे नाराज असल्यामुळे एमआयएम पक्षाने त्यांना लोकसभा लढविण्याचा प्रस्ताव दिला असल्याची चर्चा आहे. थोड्याच वेळात नसीम खान पत्रकार परिषद घेऊन सविस्तर भूमिका मांडणार आहेत. दरम्यान एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी नसीम खान यांना एमआयएमकडून निवडणूक लढविण्याचा प्रस्ताव दिला असल्याचे सांगितले जाते.

## ''शिंदे गट आणि अजित पवार गटाचा एकही खासदारष्ठ''

मुंबई :लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जवळपास सर्वच राजकीय पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले आहेत. यामध्ये भारतीय जनता पार्टी, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासह अजून काही पक्षांचा समावेश आहे. मात्र, अद्याप शिवसेना शिंदे गटाचा जाहीरनामा प्रसिद्ध झालेला नाही. यावरुन आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे गटावर खोचक टीका केली

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी लातुरात सभा

लातूर/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी लातूर येथे जाहीर सभा घेणार आहेत. या सभेची जय्यत तयारी करण्यात येत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जवळून पाहता व ऐकता यावे म्हणून या सभेत युवकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था केली जाणार असल्याची माहिती लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ऐकण्यासाठी जनता नेहमीच आतुर असते. म्हणूनच देशाच्या विविध भागात होणार्या त्यांच्या सभांना उदंड प्रतिसाद लाभत आहे. लाखो लोक सभास्थळी गर्दी करीत आहेत. पंतप्रधान मोदी हे देखील उपस्थितांच्या भावनांची दखल घेत असल्याचे दिसून येत आहे.

लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्यासाठी सभा घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यानुसार मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता ही सभा होणार आहे. गरुड चौकातून सारोळा गावाकडे जाणार्या रस्त्यालगत ४० एकरवर ही सभा होणार आहे. यासाठी अडीच लाख चौरस फूट मंडपाची उभारणी केली जात आहे. मंडप उभारणीच्या कामास सुरूवातही झाली आहे. आ. निलंगेकर



व युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर हे सभास्थळाला भेट देवून वारंवार सूचना करीत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सभास्थळी आतापासूनच पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता सभेसाठी येणार्या नागरिकांना उन्हाचा त्रास होवू नये याची काळजी आयोजकांच्या वतीने घेतली जात आहे.

युवकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विषयी प्रचंड आकर्षण आहे. ही बाब लक्षात घेता महायुतीच्या वतीने वय वर्ष १८ ते ३५ या वयोगटातील तरुणांना विशेष पास दिले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अगदी समोरच्या भागात तरुणांची बैठक व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे तरुणांना मोदींचे विचार अधिक चांगल्या पध्दतीने ऐकता येणार आहेत.

देशाच्या विकासासाठी अहोरात्र मेहनत घेणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार ऐकण्यासाठी लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, महिला व तरुणांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

## सलमान खान गोळीबार प्रकरण : अनमोल बिश्नोई विरोधात लूक ऑऊट नोटीस

मुंबई : अभिनेता सलमान खान याच्या मुंबईतील गॅलक्सी अपार्टमेट या घरावर १४ एप्रिलला गोळीबार केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात कारागृहात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या भाऊ अनमोल बिश्नोई याचं नाव पुढं आल्यानं मोठी खळबळ उडाली होती. अनमोल बिश्नोई यानं गोळीबारानंतर सोशल माध्यमात पोस्ट शेअर करुन इशारा दिला होता. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी अनमोल बिश्नोई याच्याविरोधात लूक ऑऊट नोटीस जारी केली आहे. अनमोल बिश्नोईविरोधात लूक आऊट नोटीस : अभिनेता सलमान खान याच्या वांद्र्यातील गॅलक्सी अपार्टमेंट या घरावर १४ एप्रिलच्या रात्री गोळीबार केल्यानं देशभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी गुजरातमधील भूज इथून सागर पाल आणि विकी गुप्ता या दोन आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी पनवेलमध्ये एक महिनाभर राहून रेकी केली होती. त्यानंतर आरोपींनी १४ एप्रिलच्या रात्री गोळीबार करुन दुचाकीवरुन पलायन केले होते. आरोपींनी पलायन केल्यानंतर गुजरातमध्ये धूम ठोकली होती.

आरोपींनी तापी नदीत फेकली पिस्तूले: सागर पाल आणि विकी गुप्ता या दोन आरोपींनी गोळीबार केल्यानंतर गुजरातमधील भूज इथे मुक्काम ठोकला होता. मात्र मुंबई पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळून त्यांना ४८ तासाच्या आत जेरबंद केले. या आरोपींनी गोळीबार केलेली पिस्तूल गुजरातला पळून जाताना तापी नदीत फेकून दिली होती. मुंबई पोलिसांनी तापी नदीत शोधमोहीम राबवून ती पिस्तूलं शोधून काढत जप्त केली.

अनमोल बिश्नोईची सोशल माध्यमांवर पोस्ट : कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ अनमोल बिश्नोई यानं या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली. अनमोल बिश्नोई यानं सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार झाल्यानंतर या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली होती. यावेळी अनमोल बिश्नोई यानं सलमान खान याला इशारा दिला होता. आम्हाला शांतता हवी आहे. मात्र तुला सांगूनही तू कुख्यात गुंडांना आपलं दैवत मानलं.

# अबकी बार जनता की सरकार उदगीरच्या जाहीर प्रचार सभेत काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे उपस्थित मतदारांना आवाहन

लातुर प्रतिनिधी :आपला देशाची एकात्मता, आपले संविधान आणि आपली लोकशाही वाचवायची असेल तर 'अबकी बार जनता की सरकार' ही घोषणा आता लक्षात ठेवावी लागेल, असे सांगून येत्या ७ तारखेला हाताच्या चिन्हा समोरील बटन दाबून लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी उदगीर येथील ऐतिहासिक आणि उत्साहपूर्ण सभेत बोलताना केले.

लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या महासचिव प्रियंका गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत उदगीर येथे विराट अशी जाहीर प्रचार सभा शनिवार दि. २७ एप्रिल रोजी दुपारी पार पडली या जाहीर सभेत प्रियंका गांधी यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. यावेळी बोलताना प्रारंभी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी म्हणाल्या की, मराठवाडा संतांची भूमी असल्याचे सांगत उदगीरचे हावगी स्वामी, खाजा यांच्या प्रति श्रद्धेने नमन केले. या परिसरातील शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची शिकवण आपणाला कायम चांगल्या कार्याची प्रेरणा देत राहील, असे त्यांनी म्हटले.

उदगीरच्या इतिहासातील अत्यंत विशाल आणि ऐतिहासिक सभेत बोलताना भाजप नेत्यांच्या वक्तव्यांचा समाचार घेत काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी म्हणाल्या की, मागच्या ७० वर्षात काँग्रेसने काय केले म्हणून काय विचारता यापेक्षा तुम्ही दहा वर्षात काय केले हे सांगून मते मागा. काँग्रेसने ७० वर्षात काय केले हे जनतेला माहित आहे, तुम्ही सत्तेवर येताना जनतेच्या बँक खात्यावर पंधरा लाख पाठवतो म्हणाला होतात, त्याचे काय झाले, दरवर्षी दोन कोटी रोजगारांचे काय झाले, महागाई गगनाला का भिडली, सोयाबीनला भाव का मिळत नाही, महिलांना सुरक्षित का वाटत नाही, जनतेला आता या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. या निवडणुकीत जनतेकडून प्रतिसाद मिळत नसल्याने पंतप्रधानांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. त्यामुळे पुन्हा खालचा थरावर जाऊन ते काँग्रेसवर टीका करू लागले आहेत, आमच्या परिवारावर बोलू लागले आहेत, आमच्या परिवारावर बोललेल्यास आम्ही सहन करू परंतु जनतेच्या प्रश्नाला उत्तर कोण देणार असा प्रश्न प्रियंका गांधी या सभेत उपस्थित केला तेव्हा जनतेने त्यांना टाळ्याच्या कडकडाटात उस्फूर्त साथ दिली.

यापूढे बोलतांना त्या म्हणाल्या, पहिल्या पाच वर्षात दिलेली आश्र्वासन पूर्ण केली नाहीत पुन्हा तीच आश्र्वासन देऊन निवडून आले. आता तिसऱ्यांदा काय सांगायचे हा प्रश्न सत्ताधाऱ्यांसमोर आहे, त्यामुळे लोकशाही मार्गाने आलेली महाराष्ट्रसह




**लातूरची आमची मुलगी,भाग्यश्री सुर्यकांत सुडे, यांचा खून पुणे येथे झाला, आरोपीस फाशी झाली पाहिजे. उदगीर येथील कॉग्रेंस सभेत आ. अमित देशमूख यांनी प्रियंका गांधी समोर विषय मांडला, परंतू मागासवर्गीय रिंकू बनसोडे हिचा मोरगाव ता. बारामती येथे हत्त्या झाली या बद्दल शब्द काढले नाहीत, आ. अमित देशमूख हे किती जातीयवादी आहेत हे त्यांनी सिध्द केल्याचे मत कॉग्रेस पक्षातील कार्यकर्त्यासह इतर पक्षातील कार्यकर्ते, नेते व जनतेतून उलसूलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.**

इतर राज्यातील सरकारे पैसा आणि सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून या सत्ताधारी मंडळींनी पाडली आहेत. भ्रष्टाचारांना संरक्षण दिले जात आहे. हे जनतेला अजिबात आवडलेले नाही, हे नुकत्याच पार पडलेल्या दोन टप्प्यातील मतदानावरून दिसून आले आहे. सत्ताधाऱ्यांना ४०० पेक्षा अधिक जागा कशासाठी निवडून आणायच्या आहेत याची जाणीव देशातील जनतेला झाली आहे. लोकशाही सोबत छेडछाड करून सत्ताधाऱ्यांनी अगोदरच अक्षम्य अपराध केला आहे. त्यांना शिक्षा देण्यासाठी ही निवडणूक एक संधी आहे, असेही प्रियंका गांधी यावेळी म्हणाल्या.

मतदानाला जाण्यापूर्वी जनतेने डोळे मिटून थोडा विचार करावा, आपला देश आणि आपला परिवार सुरक्षित करण्यासाठी हे मतदान करायचे आहे, हे लक्षात घ्यावे. आपणाला कोण फसवत आहे हेही लक्षात घ्यावे असे सांगून काँग्रेसने शेतीमालाला हमीभाव देण्याचे,महिलांना सुरक्षा पुरवण्याचे युवकांच्या हाताला काम देण्याचे,कष्टकऱ्यांच्या श्रमाचे योग्य मोल करण्याची आणि सामाजिक न्याय देण्याची गॅरटी दिली आहे. काँग्रेसने आजवर जी आश्र्वासने दिली आहेत ती पूर्ण केल्याची जवळच्या राज्यात म्हणजे कर्नाटकात आणि तेलंगणातील उदाहरणे ताजी आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देऊन प्रगतीपथावर नेणाऱ्या, दिलेली आश्र्वासने पाळणाऱ्या, सर्व जाती–धर्मांना सोबत घेऊन जाणाऱ्या काँग्रेस पक्षाला शक्ती देण्याचा निर्धार करावा आणि येत्या सात तारखेला हाताच्या चिन्हा समोरील बटन दाबून डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी बोलताना केले.

दरम्यान माजी गृहमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या बद्दल आदर व्यक्त करून या भूमीने डॉ. शिवाजीराव पाटील आणि विकासाभिमुख आणि लोकप्रिय नेतृत्व आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख असे दोन मुख्यमंत्री दिल्याचाही उल्लेख आपल्या भाषणात आवर्जून केला. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आपण लोकसभा निवडणूकीच्या माध्यमातून डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ या ठिकाणी एकत्र जमलो आहोत. आज आपल्या सभेसाठी पक्षाच्या महासचिव प्रियंका गांधी देशातील एका नव्या बदलासाठी लाटेच्या रुपात या ठिकाणी सहभागी झाल्या असून येणाऱ्या काळात देशाच्या राजकारणात बदल नक्की होणार असा विश्र्वास व्यक्त करीत डॉ शिवाजी काळगे याना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यांप्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज विलासराव देशमुख, उमेदवार डॉ शिवाजी काळगे, विलास सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा वैशालीताई देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बसवराज पाटील, सौ.सविता काळगे शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, माजी महापौर दीपक सुळ, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे अभय साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या विशाल सभेत बोलतांना, आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षाच्या नेत्या, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस आदरणीय प्रियंका गांधीजी यांची लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ आयोजित न्याय संकल्प सभा अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाली. काँग्रेस पक्षावर प्रेम करणारा, निष्ठा ठेवणारा जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागातील प्रचंड जनसमुदाय यावेळी लोटला होता. या विराट सभेसमोर आदरणीय प्रियंका गांधी जी यांनी गेल्या १० वर्षांत देशात निर्माण झालेले विदारक चित्र, सर्वसामान्यांच्या, शेतकऱ्यांच्या, महिलांच्या, कष्टकऱ्यांच्या व्यथा तळमळीने अन् तडफेने मांडल्या. त्यावेळी त्यांच्या व्यक्तिमत्वात आदरणीय इंदिरा गांधीजी यांची छबी आणि आदरणीय राजीव गांधीजी यांचे विचार अनुभवायला मिळत होते. त्यांनी वाढती महागाई, बेरोजगारी, महिला असुरक्षितता याला जनता वैतागली आहे. त्यामुळेच प्रियंका गांधीजी यांनी अब की बार, जनता की सरकार' असा नारा दिला. हा नारा सत्यात उतरणार हा विश्र्वास आपल्या सर्वांना आहे. यासाठी या लढाईत अखेरपर्यंत आपण सर्वांनी एकजुटीने, एकदिलाने काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या बाजूने ठाम उभे राहावे असे आवाहन केले. देशातील जनता महागाइने बेजार आहे. शेतीमालाला भाव मिळत नाही, महीलाच्या मनात असुरंक्षिततेची भावना आहे. युवकांच्या हाताला रोजगार नाही ही परिस्थिती बदलण्यासाठी परीवर्तनाची गरज असल्याचे प्रतीपादन लातूर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी यावेळी बोलतांना केले. आपण मतादनरूपी आशीर्वाद देऊन मला संसदेत पाठविल्यास लातूरचे प्रश्र्न लोकसभेत मांडून ते सोडवले जातील. लातूरची विकासप्रकीया कायम गतीमाल ठेवण्यासाठी मी प्रयत्न करेन अशी ग्वाहीही

सभास्थळी काँग्रेस नेत्या प्रियंकाजी गांधी आणि माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांचे एकत्रित आगमण झाले. इंदीरा जैसी छबी लेकर आयी है, भारत देश मे लहर लायी है, अशा घोषणा आमदार अमित देशमुख यांनी देण्यास सुरूवात केली तेव्हा सभेत प्रचंड असा उत्साह संचारला. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आपल्या भाषणाला सुरूवात करतांना सर्वांना माझा रामराम असे मराठीत म्हणत नमस्कार केला. यावेळी उपस्थितांनीही नमस्कार म्हणत त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी माजी नगराध्यक्षा उषाताई कांबळे, उदगीर विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते लातूर लोकसभा मतदारसंघातील युवक, शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उदयोजक, युवक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक.. लोकसभा निवडणुका लागल्या असल्या तरी राज्य सरकार जनहिताची कामे करीत आहेत. आचारसंहितेला अडसर करू देत नाहीत पण विरोधक मात्र सत्ताधाऱ्यां विरुद्ध टीका करतात हेच पटत नाही कोणास काय बोलावे हे सुचत नाही. डोकं बदल झाले.

दुसरा.. अरे, तुटक्या काय बोलतो आहेस काय बोलतो आहेस हे तरी तुला समजते आहे काय राज्य सरकार जनहिताची कामे करीत आहे त्यात आचारसंहितेची अडचण नाही असे सांगतोस तर त्या रिंकू बनसोडे-थिटे या हत्या प्रकरणात सरकार, पोलीस यंत्रणा काय करतेय हत्या झाली, आरोपी पकडला मग पुढचे काय हे गुलदस्त्यात कशासाठी-मतदानासाठीच ना मग अशा सरकारला-पोलीस यंत्रणेला घेऊन चाटायचे काय.

एक.. अहो, हळू बोला. भिंतीलाही कान असतात म्हणे तुम्ही रागात-व्देषात बोलत आहात पण तसे उघडकीस आल्यास मीच अडचणीत येईल म्हणून बोलतोय निवडणूक वगैरेच्या मुद्दा वेगळा असला तरी हे प्रकरण अंगलट येऊ शकते म्हणून चौकशी थांबली असावी असे वाटते.

दुसरा.. अरे, तू काय समजतोस, बारामती असो तारामती चा मतदार संघ असो पण हा भाग शरद पवार, अजित पवार यांचाच असल्याने रिंकू बद्दल चौकशी-तपास का होत नाही याचीच चीड आहे पवार कुटुंबात कुणी रिंकू असेलच ना, मग चौकशी का होत नाही.

एक.. अहो, त्या सुप्रिया सुळे -पवार यांनी स्वारी म्हटल्याचे व्हाट्सअप वर आले म्हणे मग कशाला विरोधी सूर आवळता, निवडणूक चालू, सरकारी कारभार चालू असताना वैयक्तिक विषय कशाला समोर आणतो हेच विरोधकाचे काम असते म्हणून वैतागवाडी होतेय हेच मी सांगतोय-बोलतोय पण कुणी लक्षातच घेत नाही.

दुसरा.. अरे, लक्षात जरूर येईलच पण त्यास वेळ लागेल ही रिंकू राखेतून उठली तर घरा-घरातील रिंकूचे रक्षण-संरक्षण कसे करावे हे सरकार-लोकप्रतिनिधी-सामाजिक-राजकीय कार्यकर्त्यांना-पत्रकारांनाही पळता भुई थोडी होईल हे लक्षात ठेवा?

## काय बोलता राव ?

सुशीलकुमार शिंदे-विलासराव देशमुख हे राजकारण-सत्ताकारणातील दोन एक दिवस असे गणित असे त्यात विलासरावाचे मित्र गोपीनाथराव मुंडे आणि उल्हास पवार हे ठरलेलेच. पण राजकारण भारीतुन विलासरावाचा किल्ला मजबूतच असायचा पण आज घडीला तशी परिस्थिती राहिली नाही सर्व काही वरिष्ठावरच अवलंबून बसावे लागत असल्याने काँग्रेसला डॉ. शिवाजी काळगे यांना लातूर लोकसभा राखीव ही अनुसूचित जातीचा उमेदवार म्हणून उमेदवारी द्यावी लागली अनुसूचित जातीतील कार्यकर्ते-नेते डोळे विस्करून हा काळगे कोण म्हणून विचारात पडले.

**काय बोलता राव,**

अरे, अनुसूचित जाती म्हणजे ठळकपणे महार-मांग, जंगम, ढोर, वगैरे जातीचा समावेश असताना हा माला जंगम म्हणून अवतरलेला डॉ. शिवाजी काळगे अनुसूचित जातीवर हक्क बजावतो आहे. ते काँग्रेसने केलेले करीत असलेले पाप मतदार नक्कीच भाजपच्या दावणीत बसलेल्या सुधाकर शृंगारे यास माप टाकतील अशीच प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे मग बोला दाजीबा.

## संत तुकाराम इंटरनॅशनल मॉडेल स्कूलमध्य मतदार जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी साकारली मानवी साखळी

लातूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत




मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहे. यामध्ये शाळा, महाविद्यालयांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आज लातूर शहरातील संत तुकाराम इंटरनॅशनल मॉडेल स्कूलमधील विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे मतदार जागृती केली. सुमारे साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत मतदान जागृतीचा संदेश पोहोचविण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत प्रयत्न केले जात आहेत. या अंतर्गत संत तुकाराम इंटरनॅशनल मॉडेल स्कूलमधील विद्यार्थी, विद्यार्थ्यांनींना मतदार जागृतीची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच त्यांच्याकडून संकल्पपत्राचे वाचन करून घेण्यात आले.

स्वीपचे नोडल अधिकारी तथा नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, संत तुकाराम इंटरनॅशनल मॉडेल स्कूलचे संचालक बी. ए. मैंदर्गे, उपप्राचार्य राजेंद्र ढिवरे, स्वीप सहायक डॉ. अनिल जायभाये, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, विजय माळाळे, अमित तुमकुटे, बापुसाहेब रोंगे, मयूर कणसे आदी यावेळी उपस्थित होते.

# नरेंद्र महाराजांचे कचाकच यंत्र !

## संपादकीय...

**आधुनिक भारताची-कलियुगाची झाली भेळ, लावली रताळे, आली केळी. हे ख्यातनामक गायक प्रल्हाद शिंदे यांचे गीत आणि लोकशाही गेली तर डेगंण्यामारी, हाण सख्या हाण आता तुझीच बारी हे लोकशाही भारतातील मतदारांना उद्देशून काव्यात्मक दृष्टीने नामदेव ढसाळ यांनी निवडणूक प्रक्रिया-लोकशाही भारत आणि तुम्ही-आम्ही म्हणजे कोण? आपणा शिवाय काय आहे तरीही हे सत्ताधारी आपणासच तू ही यता कंची म्हणून विचारतात त्यावेळी ही नामदेव ढसाळ यांनी पाटील-मोहिते वगैरेंना तुही यता कंची असा प्रश्न विचारून मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला असा काव्यात्मक संदर्भ नामदेव ढसाळ यांनी दिला होता. हे आमचे मत नाही तर खुद लिखित ढसाळांचे संदर्भ असल्याने नरेंद्र महाराजांनी अजित बुवा यांना कचाकच दाबण्याची परवानगी निवडणूक आयोग अर्थात भातुकली मंदिरातील भोंदूबाबा-मोदी बाबा नव्हे तर मितवाशाहिने दिल्याने राजकारणी नव्हे तर सत्ताकारणी नव्हे तर चक्क धरती-भूभागच थरथराट असल्याचे दिसते आहे. त्याच अनुमानाने नरेंद्र महाराजांचे कचाकच यंत्र बंद पडते की काय अशी शंका निर्माण होत असल्याचे स्पष्ट दिसते आहे, त्यास विकल्प नसावा असे वाटते.**

**आज घडीला भारतात लोकशाही पद्धतीने लोकसभा निवडणुका होत असून त्यातूनच सरकार स्थापन केले जाणार आहे. परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशीच लढत होत असून महायुती-महाविकास आघाडी किंवा भाजपा-काँग्रेस अशी लढत नसावी असे चित्र दिसते आहे. कारण नरेंद्र मोदी हे शरद पवार यांचे शिष्य आहेत ते महायुतीचे आहेत तर काँग्रेस-इंडिया महाविकास आघाडीचे नेतेही शरद पवारच असल्याने अजित बुवाचे कचाकच दाबणे आणि त्यात नरेंद्र महाराजांनी स्वयंभू निर्माण-वक्तव्य म्हणून दुजारा देणे यातील राजकीय रेषा मात्र बुचकाळ्यात पडणारी वाटते म्हणून लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात दबंग बाजी होते की काय अशीच शंकास्पद प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.**

**कोण खरा, कोण खोटा, कोण भ्रष्टाचारी, कोण खुद्दार आणि गद्दार याचे मोलमाप-तुलना कोणीही करू शकत नाही. परंतु आजघडीला जे घडते आहे ते आश्र्चर्यकारक आणि अवघड वाटते आहे. महाराष्ट्र राज्य सरकारी बँका घोटाळा, जलसिंचन घोटाळा, त्याबरोबरच दिल्लीतील महाराष्ट्र सदन घोटाळा हा स्वच्छ कारभार-क्लीन चिट ठरतो कचाकच दाबण्याचा शब्दप्रयोग न्याय ठरविला जातो आणि निवडणूक आयोग मान हलवून नरेंद्र जी महाराज समोर तूकवितो त्यावेळी लोकशाही गेली डेंगण्यामारी असा शब्दप्रयोग आठवल्याशिवाय राहात नाही असे म्हटल्यास वावगे ठरू नये.**

**भारत हा लोकशाही प्रधान धर्मनिरपेक्ष असा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व हक्कासह सामाजिक न्यायावर आधारित असतानाही लोकशाही-संविधानाचा गाजा वाजा करून केंद्र सरकार वटहुकूमी कारभार चालवीत असल्याने चक्क विरोधकाची गळचुंबी होताना दिसते आहे. त्यात लोकसभा निवडणुका आल्याने तर तमाम मतदार जनहिताच्या असे पोटी इकडे तिकडे पहात असताना नरेंद्र महाराज मात्र कोणाही समाज घटकास हलु-हलवू देत नाहीत ही त्यांची कसरत धोकादायकच वाटते म्हणून लोक वैतागून बोलताना दिसतात.**

**नरेंद्र महाराजांची अजब तऱ्हा दिसते, आपल्या स्वतःच्या कार्ट्याने किंवा त्याच्या दोस्ताने काहीही केले, चागली वंगळे खालले, पैंसे वगैरेचा घोळ केला तरी चालेल, पण महाराजाची सवत-मावशी म्हणून कोणी काही केले तरी तो भ्रष्टाचार-फसवणूक म्हणून त्यास वेटीस धरणे ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात कारागृहात डांमणे उचित नसावे हीच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे दुखणे असले तरी नरेंद्र महाराज आणि अमित बुवा, अजित बुवा, देवेंद्र बुवा यांना ते परवडत नाही म्हणून दे धक्का, खरे ते विकासाचे आणि खोटे ते बाळगायचे असे होत गेल्यास मायबाप मतदारा तुझा तूच सांगती-लढती-मरती-जगती म्हणून नरेंद्र महाराजांचे पाय धुन पाणी प्राशन कर किंवा त्याच पायाला उलथावुन त्या नरेंद्र महाराजांना त्यांची जागा दाखव एवढेच.**

# लोकशाहीचे बुरुज ढासळत आहेत, नागरिकांनी सावध व्हावे!

## विचारशलाका लोकशाही विशेषाक विमोचन प्रसंगी ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन

**लातूर : भारतीय लोकशाही मजबूत किल्ल्या सारखी आहे, परंतु सध्या तिच्यावर तोफाचे हल्ले चालू आहेत, तिचे बुरुज ढासळत आहेत. यामध्ये अनेक सुरंग पेरली जात आहेत. पण भारतीय संविधान आणि नागरिकांमध्ये हे सर्व काढून टाकण्याचे सामर्थ्य आहे. नागरिकांनी लोकशाहीच्या संरक्षणासाठी सावध होणे आवश्यक आहे असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन महाराष्ट्रातील ज्येष्ठ इतिहासकार आणि इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी विचारशलाका त्रैमासिकाच्या भारतीय लोकशाही: आव्हाने आणि भवितव्य या अशोक चौसाळकर गौरवांकाचे विमोचन करताना प्रतिपादन केले.**

शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र परिषद, कोल्हापूर, विचारशलाका त्रैमासिक आणि द युनिक फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत शाहू स्मारक भवनातील मिनी सभागृहामध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून भारतातील ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ व जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्लीचे सेवानिवृत्त प्रा. डॉ. गोपाळ गुरु, महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ व प्रसाद कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचा सपत्नीक कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या शुभ हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले की, धर्मनिरपेक्षता लोकशाहीचा आत्मा आहे. भारतीय राष्ट्रवादाची मांडणी धर्माच्या नव्हे तर संविधानाच्या अंगाने केली पाहिजे तरच लोकशाहीचे संवर्धन होऊ शकेल. राष्ट्रवादाची मांडणी धर्माच्याआधारे केल्यास खरी लोकशाही निर्माण करता येणार नाही. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाला चांगले नेतृत्व दिले पण त्यांनी कधीही विरोधक मुक्त भारत अशी घोषणा केली नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनी देखील स्वामी विवेकानंद यांच्या विचाराने देश चालविला. पण सध्या विरोधकासह लोकशाही संपविण्याचा प्रयत्न चालू आहे. जो धोकादायक आहे. आज धर्माच्या आधारावर राजकारण चालू आहे. जनता भ्रष्ट राज्यकर्त्यांच्या मागे वाहत जात आहे. यामुळे नागरिकांनी व तरुणांनी वेळीच सावध होऊन लोकशाहीचे संवर्धन केले पाहिजे. लोकशाही संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना आज ठणकावून सांगितले पाहिजे की जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या पाठीशी आहेत तोपर्यंत आम्हाला घाबरण्याचे काही कारण नाही. त्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांना अमृत महोत्सवाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भारतातील ज्येष्ठ राज्यशास्त्रज्ञ आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. गोपाळ गुरु म्हणाले की, सध्याची राजकारणाची स्थिती मूल्यहीनतेकडे वाटचाल करीत आहे. राजकीय नेते बेलगाम व नीतीहीन



झाले आहेत. आज आपला देश हुकूमशाहीकडे वाटचाल करीत आहे की काय? अशी शंका येते. आज लोकशाही संकटात आहे. फॅसिझम सदृश्य स्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे लोकशाही व संविधान वाचविणाऱ्याच्या मागे सर्वांनी उभे राहणे आवश्यक आहे. प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. चौसाळकर यांनी आयुष्यामध्ये कधीही स्वतः च्या वैचारिक भूमिकेशी कधीही तडजोड केली नाही. त्यांनी अस्सल जीवन कसे जगावे याची सर्वांना शिकवण दिली आहे. ते कठीण विषय देखील सोप्या भाषेत मांडतात. संयमी आणि शांत पद्धतीने मांडलेले विचार समाजावर खोल परिणाम करीत असतात. ही त्यांची चिंतन व अभिव्यक्ती शैली सर्वांनी घेण्याजोगी आहे.

याप्रसंगी महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ म्हणाले की, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर राज्यशास्त्रज्ञ म्हणून जेवढे मोठे आहेत तेवढेच ते माणूस म्हणून देखील मोठे आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व सकारात्मक आहे. त्यांना साहित्य आणि संगीतामध्ये अभिरुची आहे. यातील त्यांची समज अचंबित करणारी आहे. त्यांचे सर्वच लिखाण अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या लिखाणातील सर्व संदर्भ आणि तपशील फारच मोलाचे असतात. आज नैतीकता गुंडाळून राजकारण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पैसा असलेला माणूसच आज राजकारण करू शकतो. राज्यसंस्था प्रबळ होत असून लोकशाही दुर्बल होत आहे. राजकारणामध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारी प्रवृत्ती आहे. राजकीय प्रतिनिधीत्वाचा पाया संकुचित होत आहे. इंदिरा गांधी यांनी देशांमध्ये आणीबाणी आणली होती परंतु त्यांनी कधीही घटनेचे मूलभूत स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला नाही, हे मान्य करावे लागेल. पंडित जवाहरलाल नेहरू सारखा पंतप्रधान पुन्हा या देशाला लाभेल की नाही अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे.

सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले की, शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूरकरांनी मला भरपूर दिले आहे. याचे मला कधीही विस्मरण होणार नाही. लोकशाहीचे आचरण करीत आणि चुका करणाऱ्यांना क्षमा करून मानवाने विकास केला पाहिजे. राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय दृष्टिकोन यावर माझा पिंड जोपासलेला आहे. नव-मार्क्सवाद आज जगाला तारु शकेल असे मला वाटते. विचारशलाका त्रैमासिकामुळे मी नव-मार्क्सवाद आणि काही महत्त्वाचे लेख मी लिहू शकलो.

अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरु डी. टी. शिर्के यांनी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांचे अमृत महोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन करून असे प्रतिपादन केले की, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांचे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या विकासाबरोबर महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू सेंटरच्या विकासामध्येही मोठे योगदान आहे. त्यांचे शिक्षणामध्ये आणि सामाजिक व राजकीय चिंतनात मौलिक योगदान आहे. ते जसे लिहितात तसे वागतात. जे उपलब्ध नाही त्यावर त्यांनी लेखन व संशोधन केलेले आहे. संशोधन हा शिक्षणाचा आत्मा असतो याचे भान त्यांनी सतत ठेवले आहे.

लेल्या या समारंभाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉक्टर शिवाजी पाटील यांनी केले. याप्रसंगी विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लोकशाही विशेषांकाविषयी भूमिका विषद करताना असे प्रतिपादन केले की आज लोकशाहीचा संकोच होत आहे. लोकशाही तत्वे आणि मूल्यावर आघात होत आहेत. लोकशाहीच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी विचारवंत, साहित्यिक आणि कलावंतांनी स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. पुढे त्यांनी डॉक्टर चौसाळकर यांचे अभिष्टचिंतन करून असेही म्हणाले की प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांचे महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक चिंतन आणि समाजप्रबोधनामध्ये मोलाचे योगदान आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. श्रद्धा कोठावळे यांनी केले तर प्रा. सुनील पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. विवेक घोटाळे, डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. प्रकाश पवार, दलित मित्र भोसले, प्राचार्य टी. टी. पाटील, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. अरुण भोसले, डॉ. पाटील, प्रा. रणजीत शिंदे, गौरी चौसाळकर, डॉ. सूर्यकांत गायकवाड आदि मान्यवरांसह कोल्हापूर शहरातील प्रतिष्ठित नागरिक, विचारवंत, साहित्यिक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## टिटवाळ्यात जमिनीच्या वादातून झालेल्या मारहाणीत शेतकऱ्याचा मृत्यू, फळेगाव-उतणे गावांमधील शेतकऱ्यांमध्ये वाद

कल्याण : अनेक वर्ष जमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादातून खडवली जवळील उतणे गावातील शेतकरी बंधूंनी फळेगाव मधील वृध्द शेतकरी चांगदेव कचरू बनकरे आणि त्यांच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण केली होती. या मारहाणीत चांगदेव गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर कल्याण मधील एका खासगी रुग्णालयात महिनाभर उपचार सुरू होते. या उपचारा दरम्यान चांगदेव यांचा मृत्यू झाला आहे. बाळाराम नामदेव टोके, प्रल्हाद नामदेव टोके, सागर बाळाराम टोके, अमित बाळाराम टोके अशी आरोपींची नावे आहेत. हे सर्व शेतकरी उतणे गावातील रहिवासी आहेत. टिटवाळा पोलीस ठाण्यात या खून प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांगदेव यांचा मुलगा नीलेश (३०) यांनी या खून प्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, गेल्या महिन्यात सकाळच्या वेळेत चांगदेव यांची पत्नी उषाबाई, मजूर सविता आसरे त्यांच्या शेतात काम करत होत्या. यावेळी तेथे आरोपी गटाने आले. त्यांनी उषाबाईला ही जमीन आमच्या मालकीची आहे. या शेतात काय करता असे बोलून त्यांना तेथून दमदाटी करून हाकलून लावले. हा प्रकार उषाबाई यांनी पती चांगदेव, मुलांना सांगितला.

# सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा

भारतीय रेल्वे ही भारतीयांची जीवनवाहिनी आहे. दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या कोट्यावधीच्या घरात आहे. एकट्या मुंबईत दररोज पाऊण कोटी लोक रेल्वेने प्रवास करतात. यावरून संपूर्ण देशात किती प्रवासी रेल्वेने प्रवास करतात याचा अंदाज लावता येईल. सर्वाधिक प्रवासी संख्या असल्याने सरकारला सर्वाधिक महसुल देखील रेल्वेच मिळवून देते. जवळचा प्रवास करण्यासाठी प्रवासी उपनगरी रेल्वे सेवेचा आधार घेतात तसाच लांबचा प्रवास करण्यासाठी प्रवासी दीर्घ पल्ल्याच्या रेल्वेचा आधार घेतात. रेल्वेचा प्रवास म्हणजे कमी पैशात सुखकर प्रवास. कितीही लांबचा प्रवास असेल तरी रेल्वेत थकवा किंवा शिन येत नाही कारण लांबच्या प्रवासाचे आरक्षण अधिच केलेले असते.

आरक्षण मिळाले की प्रवासी निश्र्चीन्त असे. रेल्वे गाड्याही पुरेश्या असल्याने सर्वांना आरक्षण मिळतं, ज्यांना आरक्षण मिळत नाही ते जनरल डब्यातून प्रवास करत मात्र देशात कोरोना आला आणि हे सर्व चित्र बदलले. कोरोनामुळे लॉक डाऊन लागू झाले आणि दीर्घ पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना ब्रेक लागला. लॉक डाऊन उठल्यानंतर मात्र पूर्वीचे हे चित्र बदलले. रेल्वे प्रशासनाने काही दीर्घ पल्ल्यांच्या एक्सप्रेस गाड्यांचे मार्ग बदलले तर काही एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या. आता तर दीर्घ पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्यांमधील डब्यांच्या रचनेत धोरणात्मक बदल करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या धोरणानुसार आता मेल, एक्सप्रेस, सुपरफास्ट एक्सप्रेसमधून जनरल डबे पूर्णपणे हटवले जाणार आहेत. त्यामुळे येत्या काळात केवळ या गाड्यांमध्ये वातानुकूलित कोचच असणार आहेत. याची सुरवातही रेल्वेने केली असून अनेक एक्सप्रेस गाड्यांचे स्लीपर कोच कमी केले असून काही गाड्यांचे जनरल डबे बंद केले आहेत.

रेल्वेने स्लीपर कोच कमी केल्याने सर्वसामान्य प्रवाशांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी एका रेल्वेत १२ स्लीपर कोच तसेच चार जनरल डबे असायचे आता ही संख्या ५ ते ७ वर आल्याने गरिब तसेच सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला झळ बसत आहे. स्लीपर कोच काढून त्या ऐवजी वातानुकूलित कोच वाढवल्याने स्लीपर कोचचे आरक्षण मिळत नाही त्यामुळे प्रवाशांना द्वितीय श्रेणीचे वातानुकूलित तिकीट काढावे लागत आहे हे तिकीट सर्वसामान्य तिकिटाच्या दरापेक्षा पाचपट अधिक आहे त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक झळ बसत आहे. जनरल डबे कमी केल्याने जनरल डब्यात पाय ठेवायलाही जागा नसते. रेल्वेने डब्यांच्या रचनेत बदल करताना सर्वसामान्य, गरीब प्रवाशांचा विचारच केला नाही. सर्वच प्रवाशांना वातानुकूलित कोचचे तिकीट काढणे शक्य नाही त्यामुळे त्यांच्या प्रवासावरच रेल्वेने गदा आणली आहे. गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांनी रेल्वेतून प्रवास करू नये असेच हे धोरण आहे.

रेल्वेने हे नवीन धोरण बदलून पूर्वीप्रमाणे स्लीपर तसेच जनरल डब्यांची रचना ठेवून गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा द्यावा. जर रेल्वेने हे नवीन धोरण बदलले नाही तर भविष्यात रेल्वेला प्रवाशांच्या मोठ्या रोषाला सामोरे जावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुण,९९२२५४६२९५**

## खा. शृंगारे यांच्या प्रचारात रिपाइं आठवले गट अग्रभागी : सुरेश महाबळे

लोहा/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात रिपाइं आठवले गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असून खा. शृंगारे यांना निवडून आणण्यासाठी ते अग्रभागी काम करीत आहेत, असे प्रतिपादन रिपाइंचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे यांनी केले.



रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य संघटक विजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा उपाध्यक्ष बालाजी धनसरे, तालुका उपाध्यक्ष विश्र्वनाथ कांबळे, सचिव ॲड. एस. बी. कांबळे, चांदु जाधव, दत्ता ससाणे यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे खा. शृंगारे यांच्या प्रचारार्थ कामाला लागले आहेत. लातूर मतदारसंघातून खा. शृंगारे यांचा विजय निश्र्चित मानला जात असल्याचेही सुरेश महाबळे यांनी सांगितले.

**दुकानदारी ..**

माझ्या दुकानी दिसे
हात कमळा शेजारी
गुण्या गोविंदे नांदते
कुणाची नसे मुजोरी
दिमाखात पहादोन्ही
धनुष्याजवळ तुतारी
बंधुत्व भाव आगळा
सौहार्द चित्र चितारी
इंजिनात बसले हत्ती
चिन्हे समस्त दरबारी
दुखवत नाहीकुणास
घेतात पुरी खबरदारी
घड्याळात कप बशी
धंद्याला मिळे उभारी
सामग्री खरेदी कराया
व्यग्र सगळे कारभारी
विविध पक्ष भिन्न रंग
झेंडे शोभती जरतारी
दुकानाबाहेर पडताचं
चिन्हा होते काहीतरी
इकडेराहिले सुखेनैव
बाहेर जाता होई वैरी
सोडतेपायरी आपली
उतरता दुकान पायरी
२)

**गतिमान ..**

काय चाले रयतमनी
राज कर्त्या अनुमान
वेदनाकळे न सांगता
ते सरकार गतिमान
जे ते कसे अस्वस्थ
उद्रेक घालतो थैमान
सतत मोर्चे आंदोलने
का बदलते दिनमान
झेंड्यांनी भरले शहर
शांतता हो अस्तमान
उचकावतो का कोण
शोध घ्या गप्प गुमान
गांभीर्यपूर्ण करायचा
जन भावना सन्मान
गर्भितइशारा मिळेलं
बांधया लागा सामान
छुपेरुस्तूम कुठे कोण
आग भडकवे नादान
असाध्य होईल दुखणे
वेळेवरी व्हावे निदान
शांततामयीआंदोलने
बापूजींचे हे वरदान
दिशाहीन कोण करी
जनक्षोभ हो सावधान

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

**महिलेची २५ कोटींची फसवणूक, चोरांची ट्रीक अशी होती**

मुंबई : सायबर स्कॅमच्या घटना आता नव्या राहिल्या नाहीत. रोजच अशा बातम्या कानावर येत असतात. मात्र मुंबईत आतापर्यतचा सर्वात मोठा वैयक्तिक सायबर स्कॅम झाल्याचे मुंबई पोलिसांनी सांगितले आहे.

# ओबीसी आरक्षण मुस्लिमांना देण्याचा काँग्रेस चा कर्नाटकी कट हाणून पाडा कोल्हापूर येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन



मुंबई : कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकारने मुस्लिमांना ओबीसी प्रवर्गात समाविष्ट केले आणि ओबीसी समाजाचे संपूर्ण आरक्षण काढून घेऊन रातोरात मुस्लिमांना वाटून टाकले, आता हाच फॉर्म्युला देशभर राबविण्याचा काँग्रेसचा कट आहे, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी कोल्हापूर येथे जाहीर सभेत बोलताना केला. कोल्हापूर व हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांच्या महाविजय संकल्प सभेत ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, राजर्षि शाहू महाराज यांची पवित्र भूमी असलेल्या करवीर नगरीला व कोल्हापूरवासीयांना प्रणाम करून मोदी यांनी आपल्या भाषणाचा प्रारंभ केला. त्याआधी अबकी बार, चारसो पार अशा घोषणा देत आणि जय श्रीरामाचा जयघोष करत कोल्हापूरकरांनी मोदी यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधानांना सन्मानाचा कोल्हापुरी फेटा बांधला, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महालक्ष्मीची प्रतिमा दिली, संजय मंडलिक यांनी कोल्हापूरचा सेंद्रीय गूळ देऊन तर धैर्यशील माने यांनी संत बाळुमामांची मूर्ती देऊन पंतप्रधानांचे स्वागत केले.आपल्या तडाखेबंद भाषणात पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस, इंडी आघाडी आणि उद्धव ठाकरे यांच्या उबाठा गटावर जोरदार हल्ला केला. श्री. मोदी म्हणाले की, मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यानंतर भाजपा आणि एनडीए दोन विरुद्ध शून्य गुणांनी आघाडी घेतली आहे. इंडी आघाडीने द्वेषाच्या राजकारणामुळे सेल्फ गोल करून घेतला आहे. त्यामुळे आता फिर एक बार, गरीबो की सरकार, एसटीएसटी ओबीसी सरकार, युवा, विकास, महिला, शेतकऱ्यांचे सरकार, फिर एक बार... अशी घोषणा देत मोदी यांनी महाराष्ट्रातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले.

कोल्हापूरकर असा गोल करतील, की ज्यामुळे पुढचे सारे टप्पे इंडी आघाडीवाले पूर्ण चीत होतील, असा विश्र्वास व्यक्त करून, जगात भारी कोल्हापुरी अशी घोषणाही मोदी यांनी दिली.विकसित भारताच्या संकल्पाची ही निवडणूक आहे, पण विकासाच्या मुद्द्यावर आपण एनडीएची बरोबरी करू शकत नाही याची जाणीव जेव्हा काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना झाली, तेव्हा त्यांनी आपली रणनीती बदलली, आणि देशविरोधी अजेंडा व तुष्टीकरणाचा वापर सुरू केला. आता सत्तेवर आल्यावर कलम ३७० पुन्हा आणण्याचा काँग्रेसचा अजेंडा आहे, पण काँग्रेसचा हा मनसुबा जनता हाणून पाडेल, सीएए कायदा रद्द करण्याचा प्रयत्न केलाच, तर त्यांची हालत काय होईल हे त्यांना माहीत नाही. ज्यांना तीन अंकी आकडा गाठता येणार नाही, ते सत्तेच्या दरवाजापर्यंत तरी पोहोचतील का, असा सवालही त्यांनी केला. आता 'एक साल एक पीएम' हा फॉर्म्युला बनवायला ते निघालेत, पाच वर्षांत पाच पंतप्रधान, असा खेळ खेळायची आखणी ते करत आहेत, पण हा फॉर्मुला बनवणाऱ्यांना देश कधीच सहन करणार नाही याची जाणीव झाल्यामुळे, आता ते देशावर राग काढत आहेत. दक्षिण भारताला तोडून अलग देश करण्याची मागणी ते करत आहेत. 'अहत पेशावर, तहत तंजावर हिंदवी स्वराज्य' ही घोषणा ज्या भूमीत झाली, ती छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी, काँग्रेसच्या अशा अजेंड्याला मान्यता देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. तसे करायला गेले, तर त्यांना जनता चोख उत्तर देईल, असेही ते म्हणाले.

अयोध्येतील राम मंदिराचे पाचशे वर्षांचे स्वप्न पूर्ण झाले, पण दशकानुदशके राम मंदिरास विरोध करणाऱ्या काँग्रेसने त्यावरही बहिष्कार टाकला. प्रभू रामाच्या दरबाराचे निमंत्रण धुडकावणाऱ्यांना कधी माफ केले जाऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. जो राम को ठुकरायेगा, उसको जनता ठुकरायेगी, असा इशारा त्यांनी दिला. जे नेते सनातनला डेंग्यू म्हणाले, सनातनच्या विनाशाची भाषा करू लागले, त्या डीएमकेच्या नेत्यांना महाराष्ट्रात बोलावून त्यांचा सत्कार करणाऱ्यांना पाहून बाळासाहेब ठाकरेंना किती दुःख वाटले असेल, असा सवाल करून त्यांनी उद्धव ठाकरेंवरही निशाणा साधला. नकली शिवसेनेचे हे नेते आता अशा लोकांच्या खांद्याला खांदा लावून चालत आहेत, यामुळे बाळासाहेबांच्या आत्म्याला वेदना होत असतील, असे ते म्हणाले.

लांगूलचालन व वोट बँकेचे राजकारण करणाऱ्या काँग्रेस आघाडीची नजर आता लोकांची कमाई व दलित, मागासवर्गीयांच्या संपत्तीवर पडली आहे. या देशाच्या साधनसंपत्तीवर ज्यांचा पहिला हक्क आहे असे काँग्रेस मानते, त्यांना तुमची कमाई काढून घेऊन वाटण्याचा काँग्रेसचा कट आहे, असा इशारा त्यांनी दिला.

संपत्तीचा संपूर्ण हिस्सा वारसांना मिळू नये यासाठी वारसा कर लादण्याचे काँग्रेसचे स्वप्न जनता सफल होऊ देणार नाही. महाराष्ट्राची ही भूमी सामाजिक न्यायाचे प्रतीक आहे. पण काँग्रेस व इंडी आघाडीने सामाजिक न्याय पायदळी तुडविला. दलित, आदिवासी, एससी, एसटी, ओबीसी कोट्यातील आरक्षण काढून घेऊन मुसलमानांना देण्यासाठी काँग्रेसने कर्नाटकात रातोरात सर्व मुस्लिमांना ओबीसी ठरविले, आणि ओबीसींचे सारे आरक्षण मुसलमानांना मिळाले. हा कर्नाटक फॉर्म्युला संपूर्ण देशात राबविण्याचा कट काँग्रेसने आखला आहे. याआधीही संविधान बदलून आरक्षणावर डल्ला मारण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला होता, पण तो यशस्वी होऊ दिला गेला नाही. ज्यांनी कर्नाटकात वंचितांच्या आरक्षणावर डल्ला मारला, त्यांना देशात थारा मिळता कामा नये, असा इशाराही मोदी यांनी दिला. एनडीएने आत्मनिर्भर भारताच्या माध्यमातून, स्टार्टअप इंडियामधून देशातील जनतेसमोर संधींची द्वारे खुली केली, ज्या युवकांना काँग्रेसने रोजगार आणि नोकऱ्यांसाठी वणवण करायला लावली, तो युवक आता यशस्वी व आत्मनिर्भर होऊन जगाच्या पाठीवर अभिमानाने मिरवत आहे, असा दावाही त्यांनी केला. येत्या पाच वर्षांत विकासाच्या प्रत्येक टप्प्यातील यशाचा वाटा जनतेला मिळेल ही मोदी की गॅरंटी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कोल्हापूरच्या विकासासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक योजना राबविल्या. याकूब मेमनच्या कबरीचे सुशोभीकरण करणारे लोक महाराष्ट्राचा विकास करतील का, असा सवाल करून, येत्या ७ तारखेला कोल्हापूर व हातकणंगले येथे संजय मंडलिक व धैर्यशील माने यांना विजयी करून मोदींचे हात बळकट करा, असे आवाहनही त्यांनी केले. कारण त्यांना दिले जाणारे प्रत्येक मत मोदींना मिळेल, असे ते म्हणाले. तुमची स्वप्ने हाच माझा संकल्प आहे, आणि माझ्या जीवनाचा क्षण क्षण जनतेसाठी व देशसेवेसाठी समर्पित आहे, असे सांगून पंतप्रधानांनी कोल्हापूरच्या जनतेस विनम्र प्रणाम करून भाषणाची सांगता केली, तेव्हा पुन्हा एकदा मोदी विजयाच्या उत्स्फूर्त घोषणांनी कोल्हापूर दुमदुमून गेले.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य दौऱ्यानिमित्त ३० एप्रिल रोजी जिल्ह्यातील वाहतूक मार्गात बदल

लातूर, : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ३० एप्रिल, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौरा प्रस्तावित आहे. या दौऱ्यादरम्यान लातूर येथील गरुड चौकाच्या बाजूस बिर्ले फार्म येथील प्रधानमंत्री यांच्या सभास्थळाकडे जाणाऱ्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. सभास्थळाकडे येणारी जड व मालवाहू वाहने व इतर सर्व प्रकारच्या वाहनांस ३० एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत प्रतिबंध करून पर्यायी मार्गाचा वापर करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) नुसार आदेश निर्गमित केले आहेत.

असे असतील वाहतूक मार्गातील बदल

नांदेड रोड व उदगीर रोडकडून लातूरकडे येणारे जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने आष्टामोडपासून पुढे येण्यासाठी मनाई राहील. सोलापूर, तुळजापूरकडून लातूरकडे येणारी जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने औसा येथील तुळजापूर टी-पॉंईटपासून पुढे लातूरकडे आणण्यास मनाई राहील. कृषि महाविद्यालय, डी-मार्ट, रिंगरोडकडून येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी गरुड चौक ते बाभळगाव नाका हा रोड वाहतूकीस बंद राहील. महात्मा बसवेश्र्वर चौक, बाभळगावकडून येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बाभळगांव नाका ते गरुड चौक हा रोड वाहतुकीस बंद राहील.

बंद केलेले मार्गावरील वाहनांसाठी पर्यायी व्यवस्था

नांदेड रोड व उदगीर रोडकडून येणारी जड व माल वाहूतक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे तुळजापूर व सोलापूर जाण्याऐवजी आष्टामोड येथून नळेगाव-निटूर-निलंगा-लामजाना-औसामार्गे जातील. तसेच नांदेड रोड व उदगीर रोडकडून येणारी जड व माल वाहतूक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे जाण्याऐवजी अंबाजोगाई, बीड जाण्यासाठी आष्टामोड येथून खरोळा-रेणापूरमार्गे जातील. तसेच नांदेड रोड व उदगीररोडकडून लातूर एमआयडीसी येथे येणारी जड व माल वाहूतक करणारी मोठी वाहने आष्टामोड येथून खरोळा-रेणापूर-महापूर-नवीन रेणापूर नाकामार्गे लातूर एमआयडीसी येथे जातील. सोलापूर , तुळजापूरकडून लातूरमार्गे नांदेडकडे जाणारी जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने औसा येथून तुळजापूर टी-पॉंईटपासून लामजाना -निलंगा-निटूर-नळेगाव-आष्टामोडमार्गे जातील. तसेच अंबाजोगाई, बीडकडून येणारी जड व माल वाहतूक करणारी मोठी वाहने लातूरमार्गे जाण्याऐवजी नांदेडकडे जाण्यासाठी रेणापूर-खरोळा-आष्टामोडमार्गे जातील. तसेच एमआयडीसी येथून गरुड चौकमार्गे नांदेड-उदगीरकडे जाणारी जड व मालवाहतूक करणारी मोठी वाहने नवीन रेणापूर नाका-महापूर-रेणापूर-खरोळा-आष्टामोडमार्गे जातील.

कृषि महाविद्यालय, डी-मार्ट, रिंगरोडला येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांना गरुड चौक ते बाभळगाव नाका जाण्यासाठी वाहतूकीस बंद करण्यात येत असून त्यांनी गरुड चौक, विवेकानंद चौक, बाभळगाव नाकामार्गे जातील. महात्मा बस्वेश्र्वर चौक, बाभळगावकडून येणारी चारचाकी, तीनचाकी व दुचाकी या सर्व प्रकारच्या वाहनांना बाभळगांव नाका ते गरुड चौक जाण्यासाठी वाहतुकीस बंदी करण्यात आली असून ही वाहने बाभळगाव नाका-विवेकानंद चौक- गरुड चौकमार्गे जातील. हा आदेश ३० एप्रिल, २०२४ रोजीच्या दुपारी १२ वाजता ते ५ वाजेपर्यंत अंमलात राहतील, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यामुळे ३० एप्रिल रोजी ड्रोन वापरावर बंदी



लातूर, : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ३० एप्रिल, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौरा प्रस्तावित आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या हद्दीमध्ये २७ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४ रोजी २४.०० वाजेपर्यंत विना परवाना व बेकायदेशीर ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ (१)(३) नुसार याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. याबाबतची अधिसूचन निर्गमित करण्यात आली असून हे आदेश ३० एप्रिल २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहतील.

# घराणेशाहीचे राजकारण संपुष्टात आणण्यासाठी महायुतीला विजयी करा : अॅड बळवंत जाधव

लातूर/प्रतिनिधी : संविधान बचावची भाषा करणार्या काँग्रेसने आयुष्यभर संविधान पायदळी तुडवले असून लातूरसह देशभरात काँग्रेस आघाडीच्या पुढार्यांचे सुरू असलेले घराणेशाहीचे राजकारण संपुष्टात आणण्यासाठी लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीलाच प्रचंड मताधिक्याने विजयी करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अॅड. बळवंत जाधव यांनी केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील चिंचोली ब. येथे चिंचोली, काटगाव, निवळी जिल्हा परिषद गटाची सभा झाली. यावेळी अॅड. जाधव बोलत होते.या सभेस महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, युवा नेते ऋषिकेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, शिवसेनेचे जिल्हा युवा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, तालुकाप्रमुख राजकुमार सुरवसे, भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, दशरथ सरवदे, संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, सुरज शिंदे, विश्र्वास कावळे, काशिनाथ ढगे, संभाजी वायाळ, गोपाळ पाटील, महिला आघाडीच्या सुरेखा पुरी, अनुसया फड, जनाबाई साखरे, पांडुरंग गडदे, धनराज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, विकास शिंदे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

अॅड. जाधव म्हणाले की, संविधान बचाव म्हणणार्या काँग्रेसच्या इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू करून जनतेचे अधिकार काढून घेत संविधान पायदळी तुडवले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनाला सर्वांनी पाठिंबा दिला. यापूर्वी आरक्षण दिले होते




मात्र हायकोर्टाने रद्द केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने अभ्यास करून, त्रुटी बाजूला काढून १० टक्के आरक्षण दिले. या आरक्षणाला मागितलेली स्थगिती हायकोर्टाने दिली नाही. कोणाच्याही अपप्रचाराला मराठा समाजाने बळी पडू नये, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांनी मतदारसंघात गेल्या पाच वर्षात केलेल्या विकास कामांचा आढावा देऊन देशाला विश्र्व गुरु करण्यासाठी आणि मतदार संघाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी नरेंद्र मोदी यांनाच समर्थन द्यावे. आपली सेवा करण्याची संधी पुन्हा एकदा मला द्यावी, असे आवाहन केले. महिलांच्या अडीअडचणी समजून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करणारे नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी सुरू केलेल्या विविध योजनांची माहिती देऊन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, निवडणुकीच्या काळात विरोधकांकडून अपप्रचार केला जातो. अशा अपप्रचाराला बळी न पडता देशहित डोळ्यासमोर ठेवून गेल्या पाच वर्षात मतदारसंघात झालेल्या कामाची जाणीव ठेवून खा. शृंगारे यांना प्रचंड बहुमताने विजयी करून नरेंद्र मोदी यांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या सभेत बोलताना ऋषिकेश कराड म्हणाले की, लोकसभेची निवडणूक ही देशाला बळकट आणि खंबीर नेतृत्व देण्यासाठी महत्त्वाची आहे. नीती, नियत आणि नेता हे तीन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असून भाजपा महायुतीची नीती स्पष्ट आहे. नियत साफ आहे आणि नेता जगाला दिशा देणारा आहे. मात्र काँग्रेस आघाडीकडे नीती, नियत नाही. त्यांच्याकडे केवळ परिवार आहे. नेता अद्याप निश्र्चित नाही. नेत्याबाबत ज्यांचे एकमत होऊ शकत नाही ते विकास काय करू शकतात ? असा प्रश्र्न उपस्थित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या विविध विकास कामाचा आढावा त्यांनी सांगितला.

देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, तुमच्या आमच्या हितासाठी, विकासासाठी भाजपा महायुतीच्या कमळ चिन्हा समोरील बटन दाबून खा. शृंगारे यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार सूर्यवंशी यांनी प्रास्तावित केले. यावेळी बालाजी दुटाळ, गोपाळ सोट, प्रशांत शिंदे, गोविंद नांदे, गुरुनाथ काळे, अमर शिंदे, शिवाजी अडसूळ, योगीराज साखरे, बाबा भिसे, बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, शंकर चव्हाण, हनुमंत जाधव, श्रीकांत झाडके, अल्ताफ शेख, शरद शिंदे, शहाजी शिंदे, हनुमंत पाटील, विश्र्वास शिंदे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मतदार हजारोच्या संख्येने उपस्थित होते

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894